# जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत राबविण्यात येणा-या मुलां - मुलींसाठी विविध योजना

## सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग, प्राथमिक



१. मुलींचे शिक्षण
२. पटनोंदणी पंधरवडा :-
३. मीना मंच कार्यवाही :-
४. ज्युदो, कराटे, मर्दानी खेळांचे प्रशिक्षण :-
५. बाल आनंद मेळावा :-
६. ज्युदो - कराटे / मर्दानी खेळ :-
७. फिरते वाचनालय :-
८. किशोरी मेळावे
९. मीना मेळावे /महिला मेळावे :
१०. व्यवसाय प्रशिक्षण :-
११. गीतमंच प्रशिक्षण :-
१२. किशोरवयीन मुलींचे प्रशिक्षण :-
१३. मुलींसाठी प्रोत्साहनपर बक्षिस योजना :-
१४. ज्युडो कराटे प्रशिक्षण :-
१५. दिपशिखा उपक्रम :-
१६. मुलींचे शिक्षण :-
१७. जेंडर उपक्रमाचे प्रभावी सहनियंत्रण व व्यवस्थापन करणेसाठी जिल्ह्याने केलेल्या व्यवस्थापन :-
१८. NPEGEL प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम
१९. बालशिक्षण संगोपन केंद्र
२०. उपचारात्मक अध्यापन
२१. शिक्षक प्रशिक्षण
२२. आदर्श शाळा शिक्षक पुरस्कार
२३. व्यवसाय प्रशिक्षण
२४. जनजागृती

२५. जादा प्रोत्साहनपर अनुदान :- जनजागृती अंतर्गत कार्यक्रम :



२६. कस्तूरबा गांधी बालिका विद्यालय
२७. मुलींना प्रवेश :
२८. ज्युदो कराटे प्रशिक्षण :-
२९. खेळ व संगीतांचे प्रशिक्षण :-
३०. ज्युदो कराटे प्रशिक्षण :-
३१. विविध विषयावरील व्याख्यानांचे आयोजन :-
३२. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन :-

## आरोग्य विभागा कडील योजना

१) अर्श (मैत्री) क्लिनीकची किशोरवयीनासाठी

## समाज कल्याण विभागा कडील योजना

१) इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे.

२) दुर्बल घटकांतील इ. १ली ते इ. ४ थी मधील मुलींना उपस्थिती भत्ता

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना

१) आरोग्य आणि सकसआहार प्रशिक्षण
२) सबला (राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण )
३) पुरक पोषण आहार

## शिक्षण विभाग प्राथमिक

१) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना





# सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग, प्राथमिक, जि.प.कोल्हापूर
## नवोपक्रम :- मुलींचे शिक्षण

### प्रस्तावना

भारतातील प्रत्येक मूल हे देशाची मानव संपत्ती आहे. ही संपत्ती बौद्धिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना जीवनोपयोगी ठरेल असे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमात अनेक नव्या योजना कार्यक्रम आणि उपक्रम राबविले जातात.

आपल्या देशाचे विकसीत देशात रुपांतर व्हायचे असेल तर समाजाचा विकास व्हायला हवा समाजाचा विकास म्हणजे समाजातल्या स्त्री-पुरुषांचा विकास हा विकास शिक्षणातूनच होतो. यासाठी मुलगा आणि मुलगी यांना शिक्षणाच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. यासाठी मुलगा-मुलगी समान आहेत. हा विचार ठाम व्हायला हवा. मात्र आज ही समाजात मुलगा-मुलगी असा भेद प्रकर्षाने केला जातो व मुलगा आणि मुलगी यांना वेगळी वागणूक मिळते. याचा परिणाम समाजात पुरुषांचे आणि स्त्रियांचे प्रमाणात खूप तफावत आहे. महाराष्ट्रात २००१ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२२ आहे. तर ० ते ६ वयोगटात हे प्रमाण ९१७ आहे. यात बदल घडवून आणायचं काम शिक्षणच करेल म्हणून सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मुलींचे शिक्षण हा उपक्रम समाविष्ट करणेत आला आहे.

● **उद्दिष्टे :-**

१. मुलींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणे, टिकविणे.
२. शालेय शिक्षणाबरोबरच अनेक प्रकारची जीवन कौशल्ये विकसित करुन तिच्यातील आत्मविश्वास वाढविणे.
३. मुलींच्या विचार प्रक्रियेचा विकास करणे.
४. स्वत्त्वाची जाणीव आणि सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करुन विकसित करणे.

वरीलप्रमाणे उद्दिष्ट साध्य करणेसाठी सन २००४-०५ ते २०१० पर्यंत राबविणेत आलेले उपक्रम पुढील प्रमाणे.

● **पटनोंदणी पंधरवडा :-**

दरवर्षी १५ ते ३० जून या कालावधीत ६ते १४ वयोगटातील सर्व दाखलपात्र मुलींना शाळेत दाखल करणेसाठी शाळापातळीवर विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेत येते.



## मीना मंच कार्यवाही :-

सन २००६-०७ मध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार मीना मंच उपक्रम राबविणेत आलेला होता. प्राथमिक स्तरावर मीना कॅबिनेट व उच्च प्राथमिक स्तरावर मीना मंच स्थापन करणेत आले आहे. मीना मंच हा उपक्रम मुलींची १००% उपस्थिती वाढविणे बाबत महत्वपूर्ण कामगीरी बजावतो.



## ✱ ज्युदो, कराटे, मर्दानी खेळांचे प्रशिक्षण :-

जिल्हयातील एकूण शाळांपैकी केंद्र शाळांची संख्या १५३ आहे. या शाळांमधील इ. ५ वी वे ७ वी च्याच मुलींचा सहभाग या उपक्रमांतर्गत करण्यात आला असून माध्यमिक स्तरावरील इ.५वी ते ७वीच्या मुलीचाही समावेश करणेत आलेला आहे. या सर्व मुलींना एक महिन्याच्या कालावधीत स्वरक्षणाचे धडे (प्रशिक्षण) देण्यात आले आहे. या १ महिन्याच्या कालावधीमध्ये या मुलींना मर्दानी - कला व ज्युदो-कराटे या क्रिडा प्रकारांमध्ये वापरल्या जाणा-या संरक्षणात्मक (Defence Technique) बाबींचे प्रशिक्षण एकत्रित रित्या दिले गेले आहे. या साठी प्रत्येक शाळेवर दोन प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. एखादया कठीण प्रसंगी शस्त्रांचा वापर न करता अथवा आपल्या जवळ असणा-या साधनांचा वापर आपल्या संरक्षणासाठी कसा करावा याचे प्रशिक्षण प्रशिक्षकांमार्फत मुलींना देण्यात आले आहे.



## ❋ बाल आनंद मेळावा :-

सर्व शिक्षा अभियान जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे वतीने सन २००६-०७ मध्ये दि.२२ ते २४ मार्च, २००७ इ. रोजी आयोजित केला होता. बाल आनंद मेळावा निवडक विद्यार्थ्यांबरोबर निवासी स्वरूपाचे शिबीर आहे. या शिबीरातून मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळेल, चालना मिळेल असे उपक्रम / कार्यक्रम आयोजित केले जातात. कला, गायन, नृत्य, चित्रकला, हस्तकला, सांस्कृतिक, ऐतिहासिक व व्यावहारीक ज्ञान मुलांपर्यंत अनोख्या पध्दतीने पोहचविण्यासाठी उपक्रमांची दालने उभी करणे, ही बाल आनंद मेळाव्याची संकल्पना होती .बाल आनंद मेळाव्यामुळें अध्ययन - अध्यापनात कृतीशीलतेला वाव मिळेल तसेच शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण होण्यास मदत होते. या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांमध्ये स्वयंशिस्त व जबाबदारी या गुणांचा विकास व्हावा या अपेक्षेने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन.




**❋ उद्दीष्टे :-**मुलांना निखळ आनंद लुटण्याची संधी उपलब्ध करून देणे

१. शाळेतील अध्ययन - अध्यापनाची प्रक्रिया व समाजातील व्यावहारीक जीवन शिक्षण यांची सांगड घालून शिक्षण पध्दती समाजाभिमुख करणे

२. मुलांच्या सुप्त कला गुणांची ओळख करून सृजनशिलतेला चालना देणे

३. अशा कार्यक्रमांमुळे मुलांना समूहात मिसळण्याची, वावरण्याची, बोलण्याची संधी देऊन जीवन कौशल्य विकसीत करणे.

## ❋ ज्युदो - कराटे / मर्दानी खेळ :-

इयत्ता ५ वी ते ७वी च्या विद्यार्थीनींना गतवर्षीप्रमाणेच ज्युदो-कराटे व मर्दानी खेळांचे प्रशिक्षण देणेत आलेले आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी २ महिन्यांचा असून ऑरेंज बेल्ट पर्यंतचे प्रशिक्षण देणेत आलेले आहे १४२ शाळांमध्ये ९९९३ इतक्या लाभार्थींना हे प्रशिक्षण देणेत आलेले आहे.



## ✱ शिष्यवृत्ती परिक्षा फी :-

यामध्ये इयत्ता ४थी व ७वी च्या अनुसूचित जाती जमातीच्या मुले व मुली यांची शिष्यवृत्ती फी भरणेत आलेली आहे.





## ❋ फिरते वाचनालय :-

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूर टिपणीनुसार प्रत्येक तालुक्यातील एका समूह साधन केंद्रामध्ये फिरते वाचनालय हा उपक्रम सुरू करणेत आलेला आहे. या समूह साधन केंद्रासाठी रु.२५,०००/- च्या अधीन राहून राज्य साधन गटाने शिफारस केलेल्या पुस्तकांची विहीत पध्दतीने खरेदी करून या केंद्रामध्ये फिरते वाचनालय हा उपक्रम राबविणेत आलेला आहे.सदरची शाळा ही कमी संपादणूक असणा-या विद्यार्थ्यांची असावी.असा निकश लावणेत आला होता.





**❋ किशोरी मेळावे :** दरवर्षी इयत्ता ५ ते ७वीच्या किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन पर प्रशिक्षणाचे आयोजन करणेत येते. सन २००८-०९ पासून या उपक्रमावर तरतूद खर्च करता आलेली नाही.तथापि विना तरतूद हा उपक्रम राबविणेत येतो.



## ❋ मीना मेळावे /महिला मेळावे :

३ जानेवारी बालिका दिनाचे औचित्य साधून जिल्हयातील १८३ केंद्रामध्ये मीना मेळावा व महिला मेळावा घेणेत आलेला आहे.सदर उपक्रमासाठी प्रति केंद्र रू.१०००/- प्रमाणे अनूदान वितरीत करणेत आलेले आहे.






## ❋व्यवसाय प्रशिक्षण :-

मुलींचे शिक्षण उपक्रमांतर्गत सन २०१०-२०११ मध्ये जिल्हयामध्ये व्यवसाय प्रशिक्षण हा उपक्रम राबविणेत आला. प्रति तालुक्याला ७० मुलींचे भौतीक उदिदष्ट देऊन एकूण जिल्हयातील ७७० (इ.५वी ते ७वी च्या) मुलींना प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षण ITI च्या माध्यमातून ७ दिवसाचे देणेत आले. यामध्ये संगणक प्रशिक्षण, मोबाईल दूरूस्ती, कॅलक्युलेटर, गॅस हाताळणी, मिक्सर, संगणक, फोन, टेलिव्हिजन, इस्त्री, घडयाळ इ. दूरूस्ती आणि हाताळण्ीचे प्रशिक्षण

## ❋गीतमंच प्रशिक्षण :-

कोल्हापूर जिल्हयामध्ये प्रत्येक तालुक्यातील १० उच्च प्राथमिक शाळेतील १० विद्यार्थिनी यामध्ये ५०% मुलींचा सहभाग असेल अशा एकूण १२०० मुलामुलींना गीतमंचाचे प्रशिक्षण दिले. सदर चे प्रशिक्षण तालुक्यातील संगीत शिक्षक व संगीत तज्ञ यांचे माध्यमातून दिले यामध्ये देशभक्तीपर गीते, प्रार्थना इ. गीतांचा सराव करुन घेतला. प्रति तालुक्याला ३ दिवसाचे प्रशिक्षण दिले.

## ❋किशोरवयीन मुलींचे प्रशिक्षण :-

इ. ६ वी च्या १४०१९ इतक्या मुलींना आरोग्य शिबीराचे आयोजन केले. यामध्ये किशोरवयीन मुलींमध्ये होणारे शारीरिक बदल आरोग्य / आहार अंधश्रद्धा व वैज्ञाणिक जाणीव / जागृती, मुलींच्या वर्तनातील समस्या व निराकरण, मुलींचा व्यक्तिमत्व विकास व जीवन कौशल्य विकसन या विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन

**❋मुलींसाठी प्रोत्साहनपर बक्षिस योजना :-**

केंद्रस्तरावर मुलींच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन - क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, प्रश्नमंजूषा, इत्यादी .यामध्ये १ ते ३ क्रमांक काढून त्यांना स्मृतिचिह, पुस्तके व प्रमाणपत्र या स्वरुपात बक्षिसे देणेत आली.

**❋ज्युडो कराटे प्रशिक्षण :-**

करवीर तालुक्यामध्ये जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेंकडील तज्ञ मार्गदर्शकांचे मदतीने इ. ५ वी ते ७ वी च्या २०० मुलींना प्रशिक्षण दिले. यासाठी ४ कन्या शाळा निवडणेत आलेल्या होत्या. सदरचे प्रशिक्षण ७ दिवसाचे देणेत आले.

**❋दिपशिखा उपक्रम :-**

मुलींच्या जीवन कौशल्ये विकसनासाठी दिपशिखा हा महत्वपूर्ण उपक्रम कोल्हापूर जिल्ह्यामध्ये राबविणेत आला इ. ७ वी च्या ७००८ इतक्या मुलींना ५ दिवसाचे प्रशिक्षण देणेत आलेले आहे. यामध्ये स्वची जाणीव, निर्णय क्षमता, चिकित्सक विचार, जीवनचक्र, भावनांचे समायोजन, व्यक्ती-व्यक्तींमधील सहसंबंध, ताणतणावाचे व्यवस्थापन, सृजनशील विचार, इ. जीवन कौशल्यावर आधारित अभ्यास खेळांच्या माध्यमातून प्रशिक्षण.

## मुलींचे शिक्षण :-

### जेंडर उपक्रमाचे प्रभावी सहनियंत्रण व व्यवस्थापन करणेसाठी जिल्ह्याने केलेल्या व्यवस्थापन :-

- कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस मुलींचे घटते प्रमाण लक्षात घेवून जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सेव्ह-द-बेबी गर्ल्स हा उपक्रम राबविणेत येत आहे आणि याचाच परिणाम म्हणून कोल्हापूरचा लिंगभेद सन २००१ च्या जनगननेनुसार ८३९ वरुन २०११ मध्ये ८४५ इतका वाढलेला आहे.
- मुलींच्या शिक्षणांतर्गत दरवर्षी इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थीनीसाठी तालुका वैद्यकिय अधिकारी यांच्यामार्फत किशोरवयीन मुलींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला जातो. यामध्ये वैज्ञानिक जाणीव जागृती, आहार, आरोग्य व किशोरवयातील समस्या या अनुषंगाने मार्गदर्शन देणेत येते.
- जिल्हा सर्वसाधारण वार्षिक योजने अंतर्गत मुलींच्या शिक्षणावर भर देणेसाठी शाळेतील उपस्थिती टिकविणेसाठी व भविष्यातील समस्यांना सामोरे जाणेसाठी दिपशिखा हा जीवनकौशल्य विकसनात्मक उपक्रम राबविणेत येत आहे.
- याबरोबर विविध मेळावे, शिबीर, पथनाट्य व जनजागृती यांच्या माध्यमातून लिंगसमभाव निर्माण करणेचा प्रयत्न करणेत येतो.

## ❋NPEGEL प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम

### (National Programme of Girls Education at Elementry Level)

ग्रामीण स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय ग्रामीण स्त्री साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा ४६.५८% पेक्षा कमी असलेले तालुके (जनगणना २००१) व स्त्री पुरूष साक्षरतेच्या प्रमाणातील तफावत राष्ट्रीय पुरूष साक्षरता व स्त्री साक्षरता तफावतीपेक्षा अधिक २१.७०% असलेल्या अशा तालूक्यांची शासनाने निवड केलेली आहे. या मध्ये गगनबावडा गटामध्ये सन २००४-०५ पासून हा उपक्रम राबविणेत येत आहे.

### ❋ उद्दीष्टे :-

१. मुलींचा आत्मविश्वास वाढविणे.

२. मुलींसाठी खेळ - वाचन यांच्या संधी उपलब्ध करणे.

३. आत्मविश्वास वाढविण्यासाठी व्यवसाय कौशल्य शिकविणाच्या संधी देणे.

४. पालकांचा, समाजाच्या दृष्टीकोन बदलेल व मुलींच्या संदर्भात अभिमान वाटेल अशा दृष्टीने मुलींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

५. अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलींना विशेष मार्गदर्शन करणे.

६. शिक्षण प्रवाहात प्रत्येक मुलीला आणणे.

७. मुलींना दर्जेदार शिक्षण देणे.

### ❋ लाभार्थी :-

१. ६ ते १४ वयोगटातील शाळेतील व शाळाबाहय मुली.

२. अर्धवट शिक्षण सोडलेल्या मुली.

३. जास्त वय झाल्यामुळे प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या मुली (१४ वर्षापर्यंत)

४. बालकामगार म्हणून काम करणाऱ्या मुली

५. वंचित सामाजिक घटकातील मुली.

६. अनियमित उपस्थित असणाऱ्या मुली.

७. संपादणूक पातळी कमी असणाऱ्या मुली.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २००६-०७ पासून गगनबावडा गटामध्ये NPEGEL हा उपक्रम ख-या अर्थाने २००६-०७ पासून सुरु झालेला आहे. सन २००४-०५ पासून आदर्श केंद्रशाळा बांधकाम करणेत आले आहे.

या योजने अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील एकही मुलगी शाळाबाह्य राहू नये, म्हणून खालील प्रमाणे उपक्रम राबवणेत येतात मुलींना व्यवसाय प्रशिक्षण घेता यावे, म्हणून आदर्श केंद्र बांधकाम करणेत आलेले असून, या उपक्रमांतर्गत सर्व प्रशिक्षणे व मेळावे या आदर्श केंद्रामध्ये घेतली जातात.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २००६-०७ पासून गगनबावडा गटामध्ये NPEGEL हा उपक्रम ख-या अर्थाने २००६-०७ पासून सुरु झालेला आहे. सन २००४-०५ पासून आदर्श केंद्रशाळा बांधकाम करणेत आले आहे.



या योजने अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील एकही मुलगी शाळाबाह्य राहू नये, म्हणून खालील प्रमाणे उपक्रम राबवणेत येतात मुलींना व्यवसाय प्रशिक्षण घेता यावे, म्हणून आदर्श केंद्र बांधकाम करणेत आलेले असून, या उपक्रमांतर्गत सर्व प्रशिक्षणे व मेळावे या आदर्श केंद्रामध्ये घेतली जातात.





१. **बालशिक्षण संगोपन केंद्र :** बालशिक्षण संगोपन अंतर्गत ज्या मुली आपल्या लहान भावंडाना सांभाळणेसाठी शाळा सोडून घरी राहतात. त्या घरी राहू नयेत व त्यांच्या लहान भावंडानां साभांळणेसाठी बालशिक्षण संगोपन केंद्र सुरु करणेत आलेले आहे.

२. **उपचारात्मक अध्यापन :-** ज्या मुली अभ्यासामध्ये अप्रगत आहेत अशा मुलींसाठी उपचारात्मक अध्यापनाचे वर्ग सुरु करणेत आलेले आहेत. त्यासाठी ग्रामशिक्षण समितीची माध्यमातून स्वयंसेवकाची मानधनावर नियुक्ती केली जाते. व त्यांच्यामार्फत जादा तास घेवून अप्रगत मुलींच्या क्षमता सुधारण्याचा प्रयत्न केला जातो.

३. **शिक्षक प्रशिक्षण :-** लिंगसमभाव निर्माण व्हावा व मुलींची गळती कमी व्हावी, त्याबरोबर व्यक्तीमत्व विकासाचे मार्गदर्शन मुलींना व्हावे याकरिता शिक्षकांना प्रशिक्षित केले जाते. व शिक्षकांच्या माध्यमातून मुलींना मार्गदर्शन केले जाते.

४. **आदर्श शाळा शिक्षक पुरस्कार :-** या उपक्रमांतर्गत उत्कृष्ठ काम करणाऱ्या शिक्षकाला व शाळेला बक्षिस म्हणून वस्तूरुपात पुरस्काराचे वितरण केले जाते.

५. **व्यवसाय प्रशिक्षण :-** इ. ५ वी ते ७ वीच्या मुलींना अभ्यासाबरोबरच त्याच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांना शाळेमध्ये आवड निर्माण व्हावी. या उद्देशाने वेगवेगळ्या व्यवसाय उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये शिलाई, एम्बॉयडरी, काच पेंटीग, मोत्याचे दागिने तयार करणे, लोकरकाम, बांबूकाम, सायकल शिकणे, याशिवाय मेणबत्ती व खडू तयार करणेचे प्रशिक्षण देणेत येते.

६. **जनजागृती :-** मुलगा-मुलगी समान, मुलींचे शिक्षण, मुलींचे घटते प्रमाण यावर आधारित पथनाट्य, शाहिर, पोवाडा, कलाजथ्थ्या यांच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्यक्रम घेतले जातात.

७. **जादा प्रोत्साहनपर अनुदान :-** मुलींच्या शैक्षणिक साहित्य, दप्तर इत्यादीसाठी अनुदान दिले जाते.

सन ०६ पासून सदरची योजना सुरु आहे.

## ❋ जनजागृती अंतर्गत कार्यक्रम :





# ❋ कस्तूरबा गांधी बालिका विद्यालय

**प्रस्तावना :-**

मुलींच्या शिक्षणाची प्राथमिकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने प्राथमिक स्तरावरील मुलीच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPEGEL) या नावाने अत्यंत मूलगामी परिणाम घडवून आणणेस सक्षम असणारा कार्यक्रम सुरू केला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत प्राथमिक शिक्षणा पासून पूर्णपणे वंचित राहिलेल्या तसेच शाळा अर्धवट सोडून निरक्षरतेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुलींकरीता त्यांचे किमान इ. ८ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करणेकरीता कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही योजना सुरू करणेत आलेली आहे. केंद्रशासनाने महाराष्ट्र राज्यासाठी सन २००४ मध्ये एकूण २७ आणि सन २००६ मध्ये ९ अशी एकूण ३६ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये मंजूर केलेली आहेत. या ३६ कस्तुरबा गांधी् बालिका विद्यालयांपैकी १६ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये खाजगी संस्थांना चालविणेसाठी देणेत आलेली आहेत.

उर्वरीत २० विद्यालये दि. २७/०५/२००८ च्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक नियंत्रण केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचने प्रमाणे नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत सुरू करणेत आली आहेत.

या विद्यालयापैकी पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा या दुर्गम तालुक्यात हे विद्यालय
सुरू करणेत आलेले आहे. सदर विद्यालय जुलै २००८ मध्ये सुरू करणेत आलेले असून विद्यालयावर शिक्षण विभाग,
प्राथमिक यांचेमार्फत नियंत्रण ठेवणेत येते. या विद्यालयात इ. ५ वी ते इ. ८ वी चे वर्ग सुरू करणेत आलेले असून १०० विद्यार्थ्यांना या विद्यालयात प्रवेश दिला जातो. विद्यालयास सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सर्व सुविधा पुरविणेत आलेल्या आहेत.

## ❋ मुलींच्या शिक्षणाची उद्दीष्टये :-

१) प्रत्येक मुलीला शिक्षण प्रवाहात आणणे
२) मुलींची १००% उपस्थिती टिकविणे
३) मुलींचा आत्मविश्वास वाढविणे
४) मुलींना दर्जेदार शिक्षण देणे
५) पालकांचा, समाजाचा दृष्टीकोन बदलेल व मुलींच्या संदर्भात अभिमान वाटेल अशा दृष्टीने मुलींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.



६. संगणक शिक्षणासाठी स्वतंत्र संगणक कक्ष.

७. विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनींना शालेय गणवेश.

८. प्रत्येक विद्यार्थीनीस दरमहा रू. ५० विद्यावेतन.

९. आरोग्य तपासणी व वैद्यकीय सुविधा.

१०. कला, साहित्य, संगीत, क्रीडा यांचे प्रशिक्षण.

११. तज्ञ व अनुभवी शिक्षक वृंद.

## ❋ मुलींना प्रवेश :

ज्या मुलींचे नाव तालुक्यातील कोणत्याही नियमित शाळेत नोंदविलेले नाही आणि ज्या मुलींची नोंद -

झटपट सर्वेक्षणामध्ये शाळाबाह्य मुलगी म्हणून झालेली आहे किंवा तालुक्यातील एखाद्या गावी मुलगी आपल्या कुटुंबियांसमवेत - नव्याने स्थलांतरित झाली व ती शाळाबाह्य राहील असे असल्यास अशा मुलींना KGBV मधील प्रवेशास पात्र समजण्यात येते.

१. जेथे शिक्षणाची सोय उपलब्ध नाही अशा एकाकी खेडे, वस्त्यातील मुलींना प्रवेश दिला जातो.
२. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय जातीतील मुली आणि अल्पसंख्याक वर्गातील मुलींना प्रवेशासाठी प्राधान्य दिले जाते.
३. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुलींना २५ टक्क्यांपर्यंत प्रवेश दिला जातो .
१. विशेषत: उच्च प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी पौगंडावस्थेतील ज्या मुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध नाही अशा मुलींना प्रवेश दिला जातो
२. एकच पालक हयात असल्यास (आई किंवा वडील) त्यांचे पाल्यांना प्राधान्य दिले जातो.
३. आई किंवा वडील हयात नसलेल्या आणि या संदर्भात पालकत्व इतर व्यक्तीकडे असलेल्यास प्राधान्य दिले जाते
४. घटस्फोटित किंवा परित्यक्तेच्या मुलींना प्राधान्य दिले जाते.
५. शारीरिक अपंगत्वामुळे अक्षम असलेल्या पालकांच्या मुलींना प्राधान्य दिले जाते.
६. नैसर्गिक आपत्तीग्रस्त पालकांच्या मुलींना प्राधान्य दिले जाते.
७. जी मुलगी नियमित शाळेत जात असेल अशा कोणत्याही मुलीला प्रवेश दिला जात नाही.

## ❋ वैशिष्टयपुर्ण उपक्रम (सन २००८-०९)

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय गगाबावडा येथे दि. ०१ जुलै, २००८ रोजी सुरू करणेत आलेले आहे.

सदरचे विद्यालय निवासी स्वरूपाचे असून जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत नियंत्रण ठेवले जाते. या विद्यालयामध्ये सन २००८-०९ मध्ये ३२ विद्यार्थीनी शिक्षण घेत होत्या.त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देणेत आलेल्या आहेत.

सन २००८-०९ मध्ये या विद्यार्थीनींकरीता खालील प्रमाणे उपक्रम राबविणेत आलेले आहेत.

## ❋ ज्युदो कराटे प्रशिक्षण :-

आजच्या काळाची गरज म्हणून मुलींना स्वत:चे संरक्षण स्वत: करता यावे व मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने शालेय वेळेव्यतिरिक्त ज्युदो - कराटे प्रशिक्षणाचे आयोजन.











### ❋ खेळ व संगीतांचे प्रशिक्षण :-

मुलींना विविध खेळातील कौशल्य आत्मसात व्हावे तसेच मुलींना संगीत शिक्षणाचे धडे मिळावेत या दृष्टीने विविध खेळांचे व संगीताचे प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षकांमार्फत देणेत येते.





## ✱ ज्युदो कराटे प्रशिक्षण :-

सन २००९-१० मध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामधील किक बॉक्सींग या खेळामध्ये ६ मुलींची निवड जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर झाली. यामध्ये ब्रॉन्ज पदक मिळाले. व १ मुलीची निवड नेपाळ येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर झाली.



## ✱ विविध विषयावरील व्याख्यानांचे आयोजन :-

विद्यार्थीनींना विविध विषयांची माहिती होणेकरीता विद्यालयात विविध विषयावरील व्याख्याने आयोजित करणेत येते.





### ❋ सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन :-

विद्यार्थीनींच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांना वाव देणकरीता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन







# आरोग्य विभाग

मैत्री

किशोरांसाठी संवाद आणि सेवा केंद्र

## ! *सांग कधी कळणार तूला* !



सांग कधी कळणार तूला
अबोलपणा हा तुझ्यातला !! धृ !!
बांधेत नाजूक वादामधूनी
निर्णय कधी तू घेशील वधूनी
अंत कधी कळणार तुला
झंजुणा–या जीवातला !! १ !!

निरागस चंचल सौदर्यामधूनी
फसवेल जरी कधी तुला कोणी
परिणाम कधी कळणार तुला
रुढी जुन्या विचारांतला
सांग कधी कळणार तुला !! २ !!

मिळता मैत्रीण एकावेळी
होईल उलगज वेळोवेळी
बदल कधी कळणार तुला
तुझ्या किशोरवयातला !! ३ !!

. . . . . . . . . . .

# प्रस्तावना

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत व प्रजनन व बाल आरोग्य टप्पा-२ मध्ये **अर्श (Adolescent Reproductive & Sexual Helath)** कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. अर्श कार्यक्रमामध्ये १० ते १९ वर्ष वयोगटातील किशोर अवस्थेतील मुला-मुलींचा समावेश असुन त्यावर लक्ष क्रेंदीत केलेले आहे. आज मितीस भारतात किशोर आवस्थेत मुला-मुलींचे प्रमाण २००१ च्या जनगणनेनुसार २२ कोटी ५ लाख असुन एकूण लोकसंखेच्या २२% इतके प्रमाण आहे. अशा या किशोर वयीन अवस्थेतील मुला-मुलींचा गट हा समाजा मधील एक अत्यंत संवेदनशील घटक असुन या गटाला आरोग्यावर परिणाम करणारे विविध घटक, आरोग्यदायी जीवनशैली अवलंब करण्याच्या दृष्टीने करावयाचे वर्तणूकीतील बदल प्रौगंडावस्थेतील (किशोरवयीन अवस्थेतील) विशेष आरोग्य विषयक व अन्य समस्या, भावी आयुष्याची यशस्वी वाटचाल करण्याच्या दृष्टीने सर्वकष विकासाबाबत शास्त्रीयदृष्टया मार्गदर्शन करण्यासाठी अर्श कार्यक्रमांतर्गत अर्श (मैत्री) क्लिनीक सुरु करण्यात आले आहेत.

**अर्श कार्यक्रमाचा उद्देश:-**


१) भावी आयुष्याची यशस्वी वाटचाल सर्वकष विकासाबाबत मार्गदर्शन करणे.

२) आरोग्य विषयक सेवा निदान, उपचारदेणे.

३) सर्वागीण विकासाला पोषक वातावरण तयार करणे.

४) लग्नाचे वय प्रजनन व लैंगीक आरोग्य इतर समस्या संदर्भात जनजागृती करणे

## अर्श (मैत्री) क्लिनीकची किशोरवयीनासाठी आवश्यकता :-




आपला देश हा संस्कृती प्रधान देश आहे. अजूनही आपल्या देशात आई वडील लैंगिक विषयावर आपल्या मुलांशी मन मोकळे बोलताना दिसत नाहीत व तसे बोलताना आढळले तर वाईट मानले जाते व मुलांच्या लैंगिक समस्या तशाच मनात दबत्या स्थितीत राहतात त्यामुळे या वयोगटातील मुलांना प्रजनन व लैंगिक शिक्षणाचे ज्ञान शास्त्रीय पध्दतीने देण गरजेचे व आवश्यक आहे.

स्त्री पुरुषांना प्रजनन व लैंगिक विषयी माहिती दिली जाते पण प्रश्न आहे तो किशारवयीन मुला-मुलींचा (१० ते १९ वर्ष) किशोर अवस्थेतील मुला- मुलींत लैगिक विषयी बोलणी ऐकायला मिळतात चित्रपटात, टी.व्ही. उत्तांन दृश्ये पहायला मिळतात. त्यांचे लैगिक बद्‌लचे ज्ञान अर्धवट असले तरी उत्सुकता मात्र कमालीची असते.अनेक वर्ष त्या भावना मनात तशाच दबल्या जातात. पुढे तारुण्याच्या उंबरठयावर अनेक समस्याना सामोरे जावे लागते.

'Prevention is better than cure' अशी एक म्हण इंग्रजीत प्रचलित आहे. हीच आता आपल्याला कृतीत आणायची आहे. एखाद्या रोगाचे निदान करण्यापेक्षा तो होऊ नये याची

काळजी घेणे आपल्या हातात आहे आणि हेच १० ते १९ वयोगटातील मुलांना समजावले पाहिजे.याच मुलांना प्रजनन व लैंगिक आरोग्य शिक्षणाबाबतचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**अर्श (मैत्री) क्लिनीक अंतर्गत मिळणाऱ्या सोयी सुविधा:-**




१) माहिती (शरीरीक, मानसिक, आरोग्य, व आहार)

२) समुपदेशन/सल्ला.

३) विवाहपूर्व मार्गदर्शन.

४) कुटुंब नियोजन साधने.

५) वैद्यकिय तपासणी व उपचार.

६) माहितीची गोपनियता.

**अर्श (मैत्री) क्लिनीक अंतर्गत साध्यकरावयाचे:-**



१) मुलींचे वय१८वर्ष व मुलाचे वय २१ वर्षा खालील विवाह टाळणे

२) दोन मुलाच्या जन्मा मधील अंतर वाढवणे.

३) कुटुंब नियोजन पध्दतीचा अवलंब करणे.

४) सुरक्षीत प्रसुती.

५) असुरक्षीत गर्भपात कमी करणे.

६) नवजात अर्भकांचे आजार व मृत्यू कमी करणे.

७) कुपोषण कमी करणे.

**अर्श कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचनाः-**

**१) सेवा पोहोच पॅकेज**

प्रमाणः- किशोरवयीन मुला/मुलींना आवश्यक आरोग्य विषयक सुविधा पुरवठा

१) प्रेरणात्मक आरोग्य सेवा

- गरोदरपणातील काळजी
- आपत्कालीन गर्भ निरोधक साधनाचे समुपदेशन व उपलब्धता
- गर्भनिरोध साधनांचा पुनश्च वापराबाबतचे समुपदेशन व उपलब्धत - लैंगिक मार्ग व अवयव जंतू संसर्ग माहिती व सल्ला

२) प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा

- लसीकरण
- कुपोषण व रक्त कमतरता संदर्भात सेवा
- पोषण समुपदेशन
- सुरक्षित गर्भपात निदान व संदर्भीय सेवा

३) काळजीत्मक आरोग्य सेवा

- प्रजनन मार्ग जंतू संसर्ग व लैंगिक मार्ग जंतू संसर्ग यावर उपचार
- अनियमीत मासिकपाळी वर इलाज व समूपदेशन

- किशोरवयीन मुलां/मुलींच्या लैंगिक समस्या वर इलाज व समूपदेशन

४) संदर्भीय आरोग्य सेवा

- ऐच्छिक सल्ला व चाचणी केंन्द्र
- पालकांकडून बाळाला होणारा संसर्गाला प्रतिबंध करणे

**२) प्रभावी सेवेचे संघटन**

प्रमाणः- किशोरवयीन मुला/मुलींना प्रभावी आरोग्य सेवा पुरवणे.

**३) आरोग्य विषयक वातावरण निर्मीती सुविधा**

प्रमाणः- किशोरवयीन मुला/मुलींना आवश्यक वातावरण निर्मीतीचा शोध सुविधा

**४) सेवा पुरविणारेची क्षमता बांधणी**

प्रमाणः- किशोरवयीनाना अत्यावश्यक गरजा पुरवठा करणे आणि त्यांना प्रवृत्त करण्यासाठी तसेच त्यांच्या सोबत काम करण्यासाठी तत्पर

**५) वातावरण निर्मीती**

प्रमाणः- समाजात किशोरवयींनाना सेवा मिळवण्यासाठी वातावरण निर्मीती

**६) किशोरवयीन सोबत संभाषण**


प्रमाणः- किशोरवयींनाना आरोग्य सेवेची योग्य माहिती देणे

**७) नेतृत्व आणि पर्यवेक्षण (देखरेख)**

प्रमाणः-आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी व्यवस्थापन पध्दत

# अर्श (मैत्री) क्लिनीक संदर्भातील जिल्हयातील माहिती:

| अ. क्रं. | ठिकाण | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १ | उपजिल्हा रुग्णालय कोडोली | गुरुवार | दु.३.०० ते ५.०० |
| २ | उपजिल्हा रुग्णालय गडहिंग्लज | शनिवार | दु.२.०० ते ४.०० |
| ३ | ग्रामिण रुग्णालय चंदगड | मंगळवार | दु.३.०० ते ५.०० |
| ४ | छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय कोल्हापूर | गुरुवार | दु.३.०० ते ५.०० |


Distritc Road Map
N
RATNAGIRI
SANGLI
ToKameri
4
Malkapur
Pargoan
Kodoli
Panhala
K" Bavada
Khupire
KOLHAPUR
Hatkalangda
Shirol
Gandhinagar
Dattawad
G" Bavada
Kagal
Radhanagari
Murgud
Gargoti
Gadhinglaj
Nesari
Karnataka
Ajra
SINDHUDURG
Chandgad
Maitri clinic
Map not to scale
Copyright © 2006 Compare Infobase Pvt. Ltd

## किशोरवयीन आवस्थाः-



चार्ल्स डार्विनच्या जीवनतत्वानुसार जीवनकलहात परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे आणि त्यानुसार मानवातही परिवर्तन होत असते हे लक्षात घेऊन असे म्हणता येईल की मुल जन्माला आल्यापासुन त्याच्यात बदल होत असतो जसे अर्भकावस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था, प्रौढावस्था व वृध्दावस्था या सर्व अवस्थामध्ये अतिशय महत्वाची आवस्था म्हणजे किशोरवयीन आवस्था होय. १० ते १९ वर्ष वयोगटातील मुला-मुलींना किशोरवयीन समजले जाते या आवस्थेत जीवनाला एक वेगळे वळण मिळते ही आवस्था म्हणजे शरीरीक, मानसिक, व भावनीक विकासाची आवस्था होय. जर या आवस्थेत योग्य समायोजन करता आले तर त्याचा चांगला परिणाम संपुर्ण आयुष्यभर दिसतो.

## जागतीक आरोग्य संघटनेची किशोरावस्थाची व्याख्याः-

१) वयानुसार १० ते १९ वर्षाचा काळ

२) विशिष्ट गुणधर्म असलेल्या जीवनाच्या टप्यानुसार-

- जलद शारिरीक वाढ आणि विकास
- शारिरीक,सामाजिक,मानसिक परिपक्वता
- लैंगिक परिपक्वता आणि लैंगिक क्रिया
- प्रायोगिकता

- प्रौढ मानसिक प्रक्रियांचा विकास आणि प्रौढत्वाची ओळख

## किशोरवयीन आवस्थेतील होणारे बदलः-

किशोरवयीन अवस्थेमध्ये मुला-मुलीं मध्ये शारीरीक व मानसिक, भावनिक व सामाजिक बदल घडुन येतात.

अ) शारीरीक बदलः-



१) **मुलगाः-** मुलांच्या शरीरामध्ये अनेक बदल दिसुन येतात. जसे मुलांची उंची झपाटयाने वाढते, छाती व कंबर पसरट होते, काखेत व जांगेत केसे येऊ लागतात व त्याच बरोबर दाढी व मिश्याही फुटतात व आवाज घोगरा होतो चेह-यावर मुरूम येतात.

२) मुलगीः- मुली वयात येताना शरीरामध्ये बदल होतात शरीराची उंची, स्तन, केस, गर्भाशय, मायांग, पृष्टभाग चेहऱ्यावर पुरळ व मासीक पाळी सुरु होते चेह-यावर मुरूम येतात.इत्यादी बदल दिसुन येतात.

**ब) मानसिकबदलः**

मुला-मुलींच्या शरीर रचनेत बदल होत असतानाच मानसिक बदलही होत असतो मुला-मुलींचे एकमेकाबददलचे अनामीक आकर्षण वाढते वेशभूषेवर व सुंदर दिसण्याकडे जास्त लक्ष केंद्रीत होते नवीन आवड छंद जोपासणे भावना प्रदान होतात. इतरांचे आपल्या बद्दलचे मत महत्वाचे वाटु लागतात या वयात मुला-मुली मध्ये चंचल व अस्थीरपणा वाढतो.



**क • भावनिक बदलः-**



मुला-मुलींच्या लैंगिक भावनामध्ये, विचारामध्ये परिपक्वता येते एकमेकाच्या भावना व गरजा समजतात तसेच समान शीले व्यसनिक सख्यम् या न्यायाने मैत्रीगट तयार होतो व स्वतःकडे पुर्णतः निर्णयक्षमता आहे यामुळे पालक , पौढ वादविवाद निर्माण होतात.

**ड.सामाजिक बदलः-**

- लोक काय म्हणातील ? या दबावाखाली मुलेमुली असतात.
- मुलामुलीना प्रत्येक गोष्टीत बंधन असतात, सातच्या आत घरात
- घरातील कामाची जबाबदारी
- समाजातील कुप्रवत्तीच्या लोकांकडून छेड,विनयभंग तसेच लैगिक छळ
- मुलगी ओझे - मुलगी म्हणजे दुसा-याच्या बागेत झाडाला पाणी घालणे.

## किशोर वयीन आवस्थेतील शरीराची स्वच्छताः-

शरीराची स्वच्छता म्हणजे डोक्याच्या केसा पासुन ते पायाच्या नका पर्यंतची स्वच्छता जसे केसात कोंडा, उवा न होण्यासाठी डोक्यावरुन शाम्पु लावून स्वच्छ अंघोळ करावी व केस व्यवस्थीत पुसून विचरुन रोज साबण वापरुन अंगोळ करावी. कान साफ ठेवणे चहरा दिवसातून किमान २ वेळा धुणे, हाताची नखे कापणे, रोज दोन वेळा दात घासणे, जेवणानंतर चुळभरणे, जननेंद्रियेची विशेष काळजी घेणे व मासिक पाळीच्या वेळेस जननेंद्रिये स्वच्छ ठेवणे .



## आहार व आरोग्यः-



किशोरवयीन अवस्थामध्ये मुला-मुलींना चौरस आहार घेण्याची गरज आहे. यामध्ये शरीराची वाढ होण्यासाठी उपयोगी असे तेल, तुप, साखर, मोड आलेले कडधान्ये असे घटक असलेला आहार घ्यावा. तसेच शरीरा मध्ये ताकद व ऊर्जा मिळवण्यासाठी दुध, अंडी, मासे, चिकन मटन अशा घटकाचा आहारात समावेश असावा. त्याच प्रमाणे शरीराला संरक्षक व वाढीस उपयुक्त असणाऱ्या हिरव्या पाले भाज्या, फळे, फळांचा रस यांचा आहारात वापर असावा भरपूर पाणी प्यावे, आयोडिनयुक्त मिठाचा वापर जीवनात असावा चांगला व पौष्टीक आहार घेतल्याने मुला व मुलींचे कुपोषण होणार नाही तसेच भविष्यात मुलीच्या प्रसुतीवर व होणाऱ्या अर्भकावर होणारे विपरीत परिणाम टाळण्यास मदत होईल.

## यौन संबधाव्दारे होणारे रोग व त्याचे परिणाम :-

### १.जननेंद्रियातुन होणारा जंतुसंसर्ग/असुरक्षित लैंगिक संबधातुन होणारे रोग

मायांगतून पांढरे जाणे हा वयात येण्याचा एक भाग आहे पण हा स्त्राव जास्त असल्यास पांरा दहयासारखा हिरवा पिवळा किंवा त्यामुळे खाज येत असल्याचे लक्षणे असते हा रोग जंतूसंसर्गामुळे होतो.कधी कधी मायांगावर आजुबाजुला लालचट्टा फोड येऊ शकतात यालाच बोलीभाषेत गुप्तरोग म्हणता येईल.




### २.एड्स (ॲक्वायर्ड इम्युनोडीफिशिअन्सी सिंड्रोम)

हयुमन इम्युनोडीफिशिअन्सी व्हायरस (HIV) मुळे एड्स रोग होतो यात माणसाची प्रतिकारशक्ती नष्ट होती.

HIV लागण मुख्यत:

१.असुरक्षित लैगिक संबध

२.दुषित सुईचा वापर केल्यास

३.संसर्गित व्यक्तीच्या रक्ताशी संपर्क आल्यास

४.संसर्गित आई कडुन त्याच्या होणा-या बाळाला

माणसाच्या शरीरातील रोगप्रतिकार द्रव्ये निर्माण करणा-या पेशीचा नाश एड्स विषाणुमुळे होतो त्यामुळे कोणत्याही रोगाचा संसर्ग एड्स झालेल्या व्यक्तीस होऊ शकतो व रोगी दगावतो.

कुटुंब कल्याण :-




**१ . सुरक्षित कालावधी**

स्त्रीची मासिकपाळी नियमीत असल्यास पाळी सुरू झालेल्या दिवसापासुन ९व्या दिवसापर्यतचा कालावधी हा संबंधासाठी सुरक्षित कालावधी समजला जातो या पध्दतीमध्ये १०० % सुरक्षा नसली तरीही गर्भ धारणेची शक्यता अगदी कमी असते .

**२ . गर्भ निरोधक गोळया**

स्त्रीयासाठी संततिनियमनाच्या गर्भ निरोधक गोळया डॉक्टरांच्या सल्ल्याने सरकारी दवाखाण्यात मोफत उपलब्ध असतात गर्भ निरोधक गोळया घेतल्याने काही दुष्परिणाम संभवतात त्यामुळे हया गोळया डॉक्टरच्या सल्ल्यानेच घ्याव्यात .


**३ . ताबी**

गर्भधारणा ठाळण्यासाठी इंग्रजी T आकाराची तांबी डॉक्टरांच्या सहाय्याने गर्भाशयात बसवतात त्यामुळे गर्भधारणा होत नाही .

**४ . निरोध**

निरोध वापरल्याने वीर्याचा योनीमार्गातील प्रवेश रोखला जातो . निरोध घसरू नये व फाटु नये याकरिता विशेष काळजी घ्यावी . निरोध वापरल्याने एड्स RTI व STI सारख्या आजारापासुन संरक्षण मिळु शकते . निरोध एकदा वापरल्यावर पुन्हा वापरू नये .

## कायदा व शिक्षा :-



१. १६ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलीसोबत (तिची संमती असो वा नसो) संभोग केल्यास तो बलात्कार समजला जातो.

बलात्कार करणा-यास कायदयाने पुढील प्रमाणे कठोर शिक्षा आहे

अ.१0 वर्ष सक्त मजुरी

अथवा

ब.आजन्म कारावास

२. बालविवाह करणे हा कायदयाने गुन्हा आहे.विवाहाच्या वेळी मुलींचे वय १८ वर्ष पुर्ण व मुलाचे वय किमाण २१ वर्ष पुर्ण असणे आवश्यक असते तसे नसल्यास पालक भटजी व उपस्थिताना पुढील प्रमाणे शिक्षा आहे.

अ.त्याना १५ दिवसाची कैद

ब.रू १000/-पर्यत दंड

क.कैद व दंड अशा दोन्ही शिक्षा

३ . १८ वर्षाच्याहुन कमी वय असणाया मुलीस गर्भधारणा झाली असल्यास तिचा गर्भपात

तिच्या पालकांच्या संमतीनेच केला जाऊ शकतो .

## <u>सतत विचारले जाणारे प्रश्न</u>

**१) स्वप्नावस्था वयाच्या कितव्या वर्षी सुरु होते व किती वर्षापर्यंत राहते ?**
मुलगा व यात आला की स्वप्नावस्था सुरु होते आणि विवाहानंतर ती सहसा थांबते. विवाहानंतर, लैंगिक संबंधामुळे त्याची कामेच्छा पूर्ती होते. म्हणून आयुष्याच्या या टप्प्यावर स्वप्नावस्था सहसा आढळत नाही. तथापि, स्वप्नावस्था वयाच्या कोणत्याही वर्षी येऊ शकते.

**२) वारंवार होणाऱ्या वीर्यपतनामुळे वीर्यनाश होतो काय ?**
नाही, ही एक चुकीची समजूत आहे. वी र्याची निर्मिती ही व यात आल यानंतर सतत

चालणारी प्रकि या आहे. हे वी र्य संभोग, हस्तमैथून किंवा स्वप्नावस्था यामुळे शरीराबाहेर टाकले जाते.

**३) हस्तमैथून आरोग्यास घातक आहे का ?**
नाही, हस्तमैथुनाचा आरेग यावर अपा यकर परिणाम होत नाही. तथापि आत यंतिक अपराधित्वाची भावना हस्तमैथुनाशी निगडीत असल यास त याचा मानसिक परिणाम होऊ शकेल. आत यंतिक हस्तमैथूनाचा परिणाम दैनंदिन व्यवहारांवर होत असल यास मानोविकृतीशास्त्राच या उपचारांची गरज भासू शकते.

**४) हस्तमैथूनामूळे वि र्यनाश होतो का ?**
नाही, शरीरात वि र्य सातत याने निर्माण होत असते. वृषणकोषात संकलत झालेले वि र्य हे संभोग, हस्तमैथून, किंवा स्वप्नावस्था अशा प्रक्रि यांमूळे रिक्त होते.

**५) हस्तमैथूनामूळे लैंगिक संबंधाव्दारे पसरणारे आजार किंवा एच.आ य.व्ही.संसर्ग होतो का य ?**
नाही लैंगिक संबंधाव्दारे पसरणारे आजार किंवा एच.आ य.व्ही.संसर्ग अशा संसर्गाची बाधा झालेल या व यक्तिशी लैंगिक संबंध केल याने होतात. वस्तुतः हस्तमैथून एक विना अंतःक्षेपी आणि बहूतेक वेळा स्व यंउत्तेजित क्रि या असल याने हस्तमैथूनामूळे लैंगिक संबंधाव्दारे पसरणारे आजार किंवा एड्सचा प्रसार होण याची शक यता आजिबात नसते.

**६) पाळीच्या वेळी कोणता त्रास होऊ शकतो ?**
पाळी येण याच या अगोदर १ ते २ दिवस ओटीपोटात दुखणे, कंबर दुखणे, तसेच पाळभ आल यावर पोटात दुखणे, कंबर दुखणे, उलट या होणे, डोके दुखणे, असा त्रास काहींना होऊ शकतो. स्तन दुखरे होण, चिडचिड वाटणे, अस्वस्थ वाटणे असेही कुणाला होते. पाळीच या वेळी खुप रक्तस्त्राव झाला तर यासाठी मात्र डॉक्टरी सल्ला घ्यावा.

**७) पाळीच्या वेळी कोणती काळजी घ्याल ?**

स्वच्छ अं घोळ व स्वच्छ कपडे वापरणे हे या ४-५ दिवसात महत्वाचे ओहत. घडीसाठी वापराव याचे कपडे सूती, कोरडे असावेत. ते वरचेवर बदलावेत. स्वच्छ धुवून स्वच्छ ठिकाणी वाळवावेत बाजारातील नॅपकिन्स वापरत असाल त रते नंतर व्यवस्थित कागदात गुंडाळून जाळून टाकले पाहिजेत. सार्वजनिक ठिकाणी रस्त यांवर ते फेकू न येत. त याची विल्हेवाट आपणच योग य रितीने लावली पाहिजे. पाळीच या वेळी खूप त्रास होत असेल तर वेदनाशामक एखादी गोळी घेतल यास तो कमी होऊ शकतो. पाळीच या वेळी खूप जास्त किंवा खूपच कमी रक्तस्त्राव होत असेल होत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश यक आहे.

**८) पाळीचे चक्र म्हणजे का य ?**

मुलींच्या शरीराची वाढ पूर्ण झाली, पिट युटरी, थॉ यराईड, बीजग्रंथी, ॲडरीनल यातील आंतररस का र्य करु लागले कि हळू, हळू मुलींच्या शरीरामधील बिजग्रंथीमध ये एक-एक बीज पक्व हाउॅ लागते. हे पक्व बीज १३ ते १४ व्या दिवशी फुटून बाहेर पडते. बिजनलिकांमध ये ते खेचले जाते व तिथून ३-४ दिवसात गर्भाश यात पोहोचते. इकडे बीज पक्व होत असतानाच गर्भाश यामध ये हे बीज जर फलित झाले व गर्भधारणा झाली तर तो गर्भ रुजावा यासाठी त याच या अस्तराची वाढ होवू गादीसारखे जाड अस्तर त यार होते. तो प र्यंत १८-१९ दिवस होतात. जर बीज फलित झाले नाही तर मग गर्भाश यात केलेली ही सर्व त यारी वा या जाते व त याचे अस्तर सूटू लागते. साधारणपणे २७-२८ दिवसांपासून हे सुटलेल या अस्तराचे तुकडे, त यामूळे मोकळ या झालेल या रक्तवाहिन यातील रक्तस्त्राव, काही चिकट स्त्राव, काही पेशी असे सर्व गर्भाश याच या मुखातून योनिमार्गातून शरीराबाहेर टाकले जाते. ही क्रि या ४-५ दिवस चालते. यालाच आपण पाळी झाली असे म्हणतो. रक्तस्त्राव कमी होवु लागला की पुन्हा बीजकोशातून नवीन बीजप क्व होवु लागते व ते वर्णन केलेल या चक्रातून जाते. ही क्रि या दर महिन याला घडते यालाच पाळीचे चक्र म्हणतात.

**९) सुरक्षित काल म्हणजे काय ?**

स्त्रीला २८ दिवसांनी नि यमितपणे मासिक पाळी येत असेल तर स्त्री बीज चौदाव या दिवसाच या आसपास बिजांड कोषातून बाहेर पडते. बाहेर पडल यापासून स्त्री बीज २४ तासांप र्यंत जिवंत राहते, तर शुक्रजंतू ७२ तास जिवंत राहतात. या कालावधीत स्त्री बीज फलित होण याची शक्यता अधिक असते. तथापि बीजांड कोषातून स्त्री बीज बाहेर पडण याच या नक्की दिवसाचा अंदाज करणे कठीण आहे. म्हणून सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी मासिक पाळी चक्राचा कालावधी तीन भागात विभागला जातो. मासिक पाळी चक्राचा मधला भाग म्हणजे मासिक पाळीचा रक्तस्त्राव सुरु झाल यापासून दहावा दिवस ते अठरावा दिवस (दोन्ही दिवस जमेस धरुन) हा काळ गर्भधारणा टाळण याच्या दृष्टिने असूरक्षित समजण यात येतो. या असूरक्षित काळात गर्भधारणसा होण याची शक यता खूप जास्त असते. तथापि पाचवा दिवस ते नववा दिवस आणि एकोणविसावा दिवस ते अठाविसावा दिवस हा कालावधी हे सुरक्षित काळ म्हणून ओळखले

जातात. मासिक पाळी चक्राच या या दोन कालखंडात गर्भधारणा होण याची शक यता फारच कमी असते. ज्या स्त्रि यांची मासिक पाळी नि यमित नसते त्यांच्या बाबतीत हा साधा नि यम लागू पडत नाही. हे दोन कालखंड सूरक्षित काळ म्हण्सून संबोधले जात असले तरी मासिक पाळीचे चक्र नि यमित असणा- या स्त्रि यांच्या बाबतीत सुध्दा ते १०० टक्के पूर्णपणे सुरक्षित नसतात. क्वचित वेळा सुरक्षित काळामध ये सुध्दा बीजांडकोषातून स्त्री बीज बाहेर पडू शकते.

### १०) **मैथून (लैंगिक संबध)**

शिश्न-योनी, शिश्न-गुदद्वार, शिश्न-मुख इत्यादी सारख्या अंतःप्रवेशी लैंगिक क्रियांचे वर्णन करण्यासाठी मैथून (लैगिक संबध) हा शब्द सामान्यपणे उपयोगात आणला जातो. शिश्न योनीमध्ये घातले जाते तेव्हा या लैंगिक क्रियेस शिश्न- योनी मैथुन असे म्हणतात. जेव्हा ते गुदद्वार घातले जाते तेव्हा त्यास शिश्न-गुदद्वार मैथून असे म्हणतात. जर ते मुखामध्ये घातले तर त्यास शिश्न-मुख मैथून असे संबोधतात.

### ११) **विवाहपूर्व संभोगामुळे एच.आय.व्ही संसर्ग होऊ शकतो काय ?**

होय, तो होऊ शकतो. एच.आय.व्ही बाधित व्यक्तिशी असुरक्षित लैंगिक संबंध केल्याने एच.आय.व्ही संसर्ग होऊ शकतो. व्यक्ती अविवाहीत असली तरी, विवाहित व्यक्तिने केलेल्या क्रियेपेक्षा ती क्रिया भिन्न नसते. धोका वैवाहिक स्थितीवर नव्हे तर जोखमीचे लैंगिक वर्तन व त्याची पुनरावृत्ती यावर अवलंबून असतो.

### १२) **एच.आय.व्ही बाधीत व्यक्तिशी केवळ एकदाच लैंगिक संबंध आल्याने एच.आय.व्ही संसर्ग होऊ शकतो काय ?**

होय, एच.आय.व्ही बाधित व्यक्तिशी केवळ एक वेळा जरी असुरक्षित (विना - निरोध ) लैंगिक संबंधक्रिया झाली तर एच.आय.व्ही. संसर्ग होण्याची शक्यता असते.

१३)  किशोरवयीन आवस्था म्हणजे काय ?

किशोरावस्था किंवा पौगांडावस्था ही तारुण्यपूर्व म्हणजे बाल्यवस्थतुन प्रौढत्वाकडे जाणारी अवस्था आहे. एका विशिष्ट वयात प्रजननाशी संबंधित अवयवात बदल घडून येण्यास सुरवात होते. मुलगी बाई होण्यासाठी तर मुलगा पुरुष होण्यासाठीच्या प्रक्रियेला सुरुवात होते. सर्वसाधारणपणे मुलींसाठी ९ ते १६ वर्षे तर मुलांसाठी १० ते १६ वर्षे कालावधी किशोरवस्थेसाठी धरता येईल.

१४)  पौगंडावस्था म्हणजे काय ६

पौगंडावस्था म्हणजे वयात येण्याचा काळ किंवा यौवनात पदार्पण होय. सर्वसाधारण हा मुलांमध्ये वयाच्या १२ ते १४ वर्षात सुरु होतो व १६ ते १८ व्या वर्षी पूर्ण होतो. या काळात टेस्टेस्टेरॉन हार्मोन्स (पुरुषधर्मीय संप्रेरक ) च्या प्रभावामुळे लैंगिक अवयवांची वाढ होते. जननेंद्रियावर,जांघेत, काखेत व चेहऱ्यावर केस येतात. शारिरीक वाढ होते, उंची वाढते, वनज वाढते, आवाज घोगरा होतो, मरुम येतात, स्वप्नावस्था  व वीर्यपतन सुरु होते. मुलींच्या बाबतीत हा काळ वयाच्या ११ ते १४ व्या वर्षादरम्यान असतो. त्यांच्या शरीरातील इस्ट्रोजेन (स्त्रीधर्मीय संप्रेरक ) या हार्मोन्सच्या प्रभावाखाली मुलींचे स्तन वाढतात. जननेंद्रियावर ,काखेत केस येतात. मरुम येतात, कटीचा भाग रुंदावतो. नितंबाना गोलाई येते, उंची वाढते, मासिक पाळी सुरु होते, पुरुषांबदल आकर्षण वाटते व त्याबरोबर स्त्री सुलभ लज्जा निर्माण होते.

१५)  सौंदर्य म्हणजे काय ?

आनुवंशिक मिळालेला रंग, नाक,डोळे इ. गोष्टींवर सौंदर्य अवलंबून नाही. खरे सौंदर्य म्हणजे परिपूर्ण व्यक्तिमत्व सोप्या भाषेत सांगायचे झाले तर निरोगी शरीर, निरोगी मन, चागंला स्वभाव व ज्ञानामुळे येणारा आत्माविश्वास या गोष्टी परिपूर्ण व्यक्तिमत्वासाठी आवश्यक आहेत.

१६)  प्रेम म्हणजे काय ?

भिन्नलिंगी व्यक्तिबदल वयाच्या १५ ते १७ वर्षापासून जे नैसर्गिक आकर्षण निर्माण होऊ शकते, त्यालाच प्रेम असे नाव दिले जाते. कथा, कादंबऱ्या, सिनेमा यांमुळे ही कल्पना वाढीस लागते. हे आकर्षण दोन प्रकारचे असते. एक शारिरीक ज्यामध्ये स्वरुप, पोषाख, सौंदर्य याला फार महत्व दिलेले

असते. दुसरे मानसिक ज्यामध्ये विचार सवयी सामाजिक दृष्टिकोन व शिक्षण याला फार महत्व असते. आकर्षण व खरे प्रेम यांतील फरक थोडक्यात पुढीलप्रमाणे–

आकर्षण खरे प्रेम पटकन बसते सावकाश निर्माण होते. स्वार्थ त्याग भावनेतून बुध्दिपुरस्पर तकलादू टिकाऊ गुणदोषंची पारख नसते गुणदोषांची पारख असते.

# समाज कल्याण विभाग

## शासकीय योजना

### *१) इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे.*

**उद्देश -** प्राथमिक शाळामध्ये अनुसुचीत जाती जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून सदरचा उपस्थिती भत्ता अदा करण्यात येतो.

**अटी व शर्ती.**

१) या शिष्यवृत्तीमध्ये मागासवर्गीय मुलींना उत्पन्नाची व गुणांची अट नाही.

२) इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या सर्व मागासवर्गीय मुलींना दरमहा रु. ६०/- प्रमाणे १० महिन्याकरितां रक्कम रुपये ६००/- मंजूर केले जातात.

३) सदर योजनेमध्ये मुलींना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

४) सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त शाळाचे मुख्याद्यापकाकडून मुलींची प्रवर्गनिहाय माहिती मागविण्यांत येते.

- सदर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत सन २०१०-११ मध्ये खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | खर्च | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती | ७८.०० | १२९८५ |
| २ | विजाभज/विमाप्र | ७.२० | १२०३ |
| | एकूण - | ८५.२० | १४१८८ |

### *२) इ. ८ वी ते १० मध्ये शिकणा-या अनुसुचीत जातींच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना*

**उद्देश -** माध्यमिक शाळेमध्ये अनसुचीत जाती -जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून सदरची शिष्यवृत्ती देण्यात येते. यापैकी अनुसूचित जातीमधील मुलींना शिष्यवृत्ती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,

कार्यालयाकडून मंजूर केली जाते व विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींची शिष्यवृत्ती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागाकडून दिली जाते.

- **अटी व शर्ती -**

संबंधीत शाळेच्या मुख्याद्यापकाकडून मागासवर्गीय मुलींच्या नावाच्या यादीसह प्रस्ताव आवश्यक आहे.

**तपशील -**

- शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय मुलींच्या उत्पन्नाची व गुणांची अट नाही.
- इयत्ता ८ वी ते १० वी मधील सर्व मागासवर्गीय मुलींना दरमहा रु. १००/- प्रमाणे १० महिन्याकरितां रुपये १०००/- शिष्यवृत्ती दिली जाते.
- सदर योजनेमध्ये मुलींना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.
- सन २०१०-११ या वित्तीय वर्षात रु. ८८.०० लाख खर्च झालेला असून १०३१८ मुलींना दिलेला आहे.

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना, जिल्हा परिषद कोल्हापूर

१. **आरोग्य आणि सकसआहार प्रशिक्षण :- एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत १५ ते** ४५ वयोगटातील मुली व महिला यांना प्रशिक्षण दिले जाते.

२. **सबला (राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्ष्मीकरण ) :-** एकात्मिक बाल विकास सेवायोजने अंतर्गत ११ ते १८ वर्षे वयोगटातील शाळाबाहय व १५ ते १८ शाळेत जाणा-या किशोर वयीन मुलींना घरीघेऊन जाणेचा (टी.एच.आर) आहार अंगणवडीमध्ये देणेत येतो. व किशोरवयीन मुलींना सबला योजनेअंतर्गत ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींना जीवनकौशल्य,व्यवसाय प्रशिक्षण,व आहार वआरोग्य प्रशिक्षण देणेत येणार आहे.

३. कोल्हापूर जिल्हयामध्ये शाळेत जाणा-या ११ ते १८ वर्षे वयोगटातील १३०१७५ मुली आहेत व ११ ते १८ वर्षे वयोगटातील शाळाबाहय ९३२५ किशोरवयीन मुली आहेत यापैकी, घरीघेऊन जाणेच्या आहाराची मागणी (टी.एच.आर) ६१८३३ मुलीने केलेली आहे.

४. **पुरक पोषण आहार :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना व स्तनदा व गरोदर माता व किशोरवयीन मुलींना घरपोच आहाराचा (टी.एच.आर) पुरवठा केला जातो .

## शिक्षण विभाग प्राथमिक

## सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना

माहाराष्ट् राज्यामध्ये सामाजिक व शैक्षणिक सूधारणसाठी सामाजिक बांधिलकी स्वीकारुन स्वखर्चाने मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टने सेवाभावी पालकांच्यामार्फत गेलया कांही वर्षापासून सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना अपौपचारिकरीत्या कार्यान्वित केली जात आहे. हालाखीच्या आर्थिक परिथतीमुळे शिक्षण मध्येच सोडाव्या ला्गणा-या अनेक मुलींना या योजनेमध्ये मोठा दिलासा मिळालेला आहे. आणि अशा मुलींचे शिक्षणामध्ये गळतीचे प्रमाण कमी झालेले आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिने आता शासनाने या योजनेस निश्चित प्रकारचे स्वरुप देण्याचे ठरविले आहे`. त्यानुसार प्रत्येक निधी उभारुन या निधीतून गरजू व होतकरु मुलींना शिक्षणासाठी हातभार लावण्याची मोठया प्रमाणात चळवळ उभी करावयाची आहे.

ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या मुलींना आणि शहर उपनगरातील

झोपडपटटयामधील गरजू मुलींना या योजनेचा लाभ देण्यात येईल इयत्ता १ली ते ८वी इयत्तेत शिकणा-या मुलींना दरमहा रु. ३० किंवा वार्षिक रु. ३६०/ किंवा रु. ३०००/ एकदाच आठ वर्षासाठी देणगी म्हणून देता येतो.

सदर निधीचे आर्थिक व्यवहारासाठी जिल्हा पातळीवर एक समिती नेमली जाते. या समितीचे सर्व सदस्य या योजनेविषयी जाणीव जागृती निर्माण करण्याकरीता सतत प्रयत्नशील राहून मूलींच्या शिक्षणासाठी जिल्हा स्तरिय निधीस सढळ हाताने मदत करण्यास जनतेस आवाहन करतील. दत्तक पालकाकडून देणगी दाराकडून मिळालेल्या रकमा जिल्हा सहकारी बॅक/ बॅक ऑफ महाराष्टमध्ये विशिष्ट मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येतात. या खात्यावरिल रकमेवर मिळणा-या व्याजातून समिती या योजनेतील लाभार्थीना आर्थिक मदत करतात. लाभार्थीची यादी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक तयार करतात. जिल्हा समिती जवळ उपलब्ध असलेल्या निधीनुसार लाभार्थीची संख्या निश्चित करणेत येते.

जिल्हास्तरीय समिती स या योजनेसाठी मिळवेला पैसा निकषानुसार पात्र मुलींच्या शिक्षणासाठीच वापरणे बंधनकारक राहील. याशिवाय इतर कोणत्याही कामासाठी या निधी ीचा विनियोग करता येणार नाही.

समाजाचा सक्रीय सहभाग आणि सढळ अर्थसहाय्य हा योजनेचा मुळ आधार असलेमुळे शासनाकडून या विषयी कोणतेही अर्थसहाय्य दिले जात नाही.